जा.क्र.मसंके/भासुयो/४०९/२०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता. दापोली. जि. रत्नागिरी
दिनांक:— 18 AUG 2022

प्रति,

____________________________

____________________________

____________________________

**विषय:— फवारणीसाठी नॅपसॅक व इलेक्ट्रीक पंप खरेदी करण्यासाठी दरपत्रक देणेबाबत.**

महोदय,

वरील विषयास अनुसरून मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत भाजीपाला सुधार योजना वाकवली व बिजोत्पाद, पांगारी प्रक्षेत्रावरील पिकांना फवारणी करण्यासाठी नॅपसॅक व इलेक्ट्रीक फवारणी पंप खरेदी करण्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | खरेदी संख्या |
|---|---|---|
| १ | हॅन्ड स्प्रे (नॅपसॅक पंप) | ५ नग |
| २ | इलेक्ट्रीक स्प्रे (नॅपसॅक पंप) | २ नग |

वरील साहित्याचे दरपत्रक बंद लखोटयात मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली ता. दापोली जि. रत्नागिरी यांचे नावे कार्यालयात दिनांक ०२ /०९ /२०२२ पर्यत पोहचेल असे पाठवावे.

**उपरोक्त तपशिलातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे:**

१. दरपत्रक देताना लखोटयावर **'भाजीपाला सुधार योजना नॅपसॅक व इलेक्ट्रीक पंप खरेदी करण्यासाठीचे दरपत्रक'** असे स्पष्ट नमुद करावे. दिनांक ०२ /०९/२०२२ नंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२. दरपत्रकावर जी.एस.टी. क्रमांक नमुद करावा. जी.एस.टी. लागू होत नसल्यास तसे प्रमाणपत्र सादर करावे तसेच पॅनकार्डची छायांकित प्रत सोबत जोडणे बंधनकारक राहील.
३. सदर फवारणी पंप मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली भाजीपाला सुधार योजना येथे विहित मुदतीत कार्यालयास पोहोच करणे आवश्यक आहे.
४. वरील फवारणी पंप खरेदी करणेबाबतचे एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा/रद्द करण्याचा तसेच खरेदी संख्या कमी जास्त करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार राखून ठेवीत आहेत.
५. वरील फवारणी पंप देयकामध्ये बँक खात्याची छायांकित प्रत, पॅनकार्ड, आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे. देयकाची अदायगी रक्कम बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक ०२ /०९ /२०२२ रोजी या कार्यालयात उघडण्यात येतील.
७. टपाल खात्याच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
८. अधिकृत विक्रेते अथवा उत्पादक असल्यास तसे प्रमाण पत्र जोडावे. अधिकृत दरसूची जोडावी.
९. दरपत्रकामध्ये संबंधीत सर्व करांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

**भाजीपाला विशेषज्ञ,**
भाजीपाला सुधार योजना,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली